जाक्र/कृआ/फलो-४/वितरकनोंदणी/ ९०९ /२०१६
कृषि आयुक्तालय पुणे दि. ०५/०९/२०१६

प्रति

**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी**
**सर्व**

**विषय- प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजनेंतर्गत सन २०१६-१७ करीता वितरकांची नोंदणी करणेबाबत..**

**संदर्भ-** १. शासन निर्णय क्र.प्र.क्र.सि.२११६/प्र.क्र.१४०/४-अे/दि.१२ऑगस्ट २०१६
२. कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र.कृआआ /२०१६/ सुसिंयो/ प्रमंकृसिंयो/ प्रमा/ प्र.क्र.२५/७९४/दि.३०/८/२०१६

संदर्भ क्र.१ वरील शासन निर्णयान्वये प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजना सन २०१६-१७ मध्ये ३४ जिल्हयांमध्ये राबविण्यास मान्यता दिली असून संदर्भ क्र.२ अन्वये योजनेच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

कृषि आयुक्तालयाकडील दि.३/९/२०१६, दि.७/९/२०१६ व दि.८/९/२०१६ च्या आदेशान्वये वरील योजनेंतर्गत सूक्ष्म सिंचन संच पुरवठा करण्यासाठी ६२ ठिबक संच उत्पादक कंपन्यांना तर ५४ तुषार संच उत्पादक कंपन्यांना मान्यता देण्यात आली आहे. सदर मान्यता देण्यात आलेल्या उत्पादक कंपन्यांच्या यादया ई-ठिबक प्रणालीवर डाऊनलोडसमध्ये टाकण्यात आल्या आहेत. तसेच कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र.८८३ / दि.६/९/२०१६ अन्वये सदरील योजनेंतर्गत लाभधारकांचे ऑनलाईन अर्ज स्किारण्यासाठी दि.७/९/२०१६ ते दि.६/१०/२०१६ या कालावधीसाठी ऑनलाईन प्रणाली सुरु करण्यात आली आहे. या अनुषंगाने जिल्हास्तरावरुन वितरकांची नोंदणी तातडीने करुन घेणे आवश्यक असल्याने त्याबाबतची प्रक्रिया तातडीने राबविण्यात यावी त्यामुळे लाभार्थी शेतक-यांना ऑनलाईन प्रणालीव्दारे अर्ज भरणे सोईचे होईल.

(सही)
**संचालक,फलोत्पादन**
**कृषि आयुक्तालय, पुणे-५**

**प्रत- विभागीय कृषि सहसंचालक, सर्व यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी**